Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्रीनवनाथांच्या गोष्टी

सरस्वती ग्रंथ भांडार पुणे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नवनाथांच्या गोष्टी

: लेखक :

श्री. दीपक रं. जोशी (निर्मळ)

किंमत १० रुपये

★ प्रमुख वितरक ★

मे. सरस्वती पब्लिकेशन्स्

२८/अ, बुधवार पेठ; अंबर चेंबर्स, ४था मजला, पुणे २.

☎ ४४५१२१९ / ४४५४०८६

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नवनाथांच्या गोष्टी

१. मच्छिंद्रनाथ

कामिक नावाचा एक कोळी महादेवाचा भक्त होता. शंभू महादेवाच्या कृपेने त्याला यमुनानदीवर एक नवजात मुलगा सापडला होता. माशाच्या मादीने त्या बालकाला जन्म दिला, म्हणून कामिकाने त्या मुलाचे नाव मच्छिंद्र असे ठेवले. कामिकाची बायको शारद्वता हिने त्या मच्छिंद्र बाळाची चांगली जोपासना केली होती. एके दिवशी तो कोळी यमुनानदीत जाळे टाकून मासे धरीत होता. त्या दिवशी त्याने पाच वर्षे वयाच्या त्या मच्छिंद्र बाळाला आपल्याबरोबर प्रथमच नदीवर नेले होते. नदीकाठावर मोठ्या टोपलीजवळ मच्छिंद्र बाळ बसला होता.

कामिकाने जाळ्यात पकडलेले मासे नदीकाठावर टोपलीत आणून टाकले आणि तो पुनः पाण्यात गेला. टोपलीत पडलेले मासे तडफड करीत होते. ते पाहून मच्छिंद्र बाळाला दया आली. त्याने टोपलीतील एकेक मासा हाती धरून पाण्यात सोडून दिला.

वडिलांनी मासे आणून टोपलीत टाकावेत आणि मुलाने हळूहळू ते मासे पुन्हा पाण्यात सोडून द्यावेत; असे होता होता कामिक दमला. आज खूप मासे पकडले आहेत, आज चांगलीच चंगळ झाली आहे,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अशा आनंदात तो कामिक कोळी टोपलीजवळ आला आणि पाहतो तर काय ? टोली रिकामीच !

"अरे मच्छिंद्रा, टोपलीतील मासे काय झाले ?" वडिलांच्या त्या प्रश्नावर मच्छिंद्र बाळ म्हणाला,

"अहो, ते मासे खूप तडफड करीत होते. मी त्यांना पुनः पाण्यात सोडून दिले."

"अरेरे ! काय केलंस हे ? मूर्खा, आता खाणार काय ? मला वाटतं, तू भीक मागून जगणार आहेस!" असे बोलून रागाने कामिकाने मच्छिंद्राच्या थोबाडीत मारली आणि त्याला तेथून हाकलून दिले. मच्छिंद्र म्हणाला, "ठीक आहे. आता भिक्षा मागूनच मी जगेन!"

मच्छिंद्र बाळ तेथून निघाला. त्याने थेट काशी-वाराणसी गाठली. काशी-विश्वनाथाचे दर्शन घेतले. भिक्षा मागून तो तेथे काही दिवस राहिला. मग त्याने हिमालयात बदरिकावनात भागीरथी तीरावर मुक्काम ठोकला.

बारा वर्षे त्याने तेथे कडक तपाचरण केले. तेव्हा त्याला दत्तात्रेय आणि भगवान शंकर प्रसन्न झाले.

भगवान शंकराला आदिनाथ गुरू मानून मग मच्छिंद्राने तो नाथपंथ स्वीकारला. त्याचे तेज वाढले. त्याने जटा वाढविल्या. सर्वांगाला विभूती लावली. कमरेला लंगोटी लावली. कान फाडून त्यात मुद्रा घातल्या. हातात शैली, कंथा आणि शिंकट घेतली. काखेत भस्माची झोळी आणि दुसऱ्या बगलेत भिक्षेची झोळी घेतली, तो गावोगाव 'अलख निरंजन !' अशी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आरोळी देऊन भिक्षा मागू लागला.

बदरिकाश्रमातून निघून तो सप्तशृंगी देवीच्या दर्शनाला गेला. मार्तंड पर्वतावरील नागवृक्षाच्या फांदीवर बावन्न देवता बसल्या होत्या. मच्छिंद्राने त्या देवीला आणि त्या देवतांना प्रसन्न करून घेतले. त्याला सर्व सिद्धी प्राप्त झाल्या. महाकाली आणि बारा आदित्य त्याला प्रसन्न झाले.

मच्छिंद्रनाथ मग रामेश्वरला गेले. तेथे त्यांचे मारुतीशी युद्ध झाले. त्या युद्धात मच्छिंद्राने आपल्या मंत्रसामर्थ्याने मारुतीला जिंकले. मारुती त्यांचा मित्र बनला. नंतर हिंगळाई देवीच्या दर्शनाला जाताना तेथील अष्टभैरव आणि चामुंडा, शंखिनी, डाकिनी इत्यादींनी त्या योगी मच्छिंद्राला अडविले. मच्छिंद्राने त्यांचा पराभव केला तेव्हा स्वतः हिंगळाई देवीने प्रसन्न होऊन मच्छिंद्राला अस्त्रविद्या दिली.

शरभा नदीच्या परिसरात बारामल्हार जंगलात वेताळाचे राज्य होते. मच्छिंद्रनाथ त्या अरण्यात गेले तेव्हा हजारो भुतांनी मच्छिंद्रनाथांना त्रास दिला. पण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मच्छिंद्रनाथांनी आपल्या मंत्रसामर्थ्याने ती सारी भुते जमिनीला चिकटवून टाकली. भुतांचा राजा वेताळ याला शरण आणले. मच्छिंद्रनाथ म्हणाले, "माझे भस्म किंवा विभूती जेथे असेल तेथे तुम्ही कसलाही त्रास देणार नाही, असे कबूल करा !" मग वेताळाने आणि साऱ्या भूत-प्रेत-समंधांनी तसे कबूल केले.

नंतर मच्छिंद्रांनी कोकणात जाऊन कार्तिक स्वामींचे दर्शन घेतले. आडुळगावी भद्रकाली, दुर्गादेवी, कालिकामाता यांना प्रसन्न करून घेतले. स्वतः भगवान शंकरही तेथे प्रगट झाले. लोककल्याणाच्या महान कार्यात साहाय्य करण्याचे त्या सर्वांनी कबूल केले.

गदातीर्थावर वीरभद्राशी युद्ध करून मच्छिंद्रनाथ विजयी झाला. तेथे ब्रह्मा, विष्णू, इंद्र, कुबेर, वरुण, अग्नी, अश्विनी वगैरे सर्व देवदेवता मच्छिंद्राला प्रसन्न झाल्या. मग स्वर्गात सात वर्षे राहून त्याने वैकुंठ, कैलास, अमरपुरी, सत्यलोक यांची यात्रा केली.

पृथ्वीवर येऊन मग मच्छिंद्राने भोगावती नदीच्या पाण्याची अनेक कुंडे सरस्वती नदीकाठी स्थापन केली. तेथेच उष्ण पाण्याची कुंडे निर्माण करून वज्रेश्वरी अंबिका देवीची स्थापना केली.

नंतर द्वारका, अयोध्या वगैरे क्षेत्रांच्या यात्रा करताना वाटेत पाशुपत नावाच्या राजाला रामाचेही प्रत्यक्ष दर्शन घडविण्याचा चमत्कार मच्छिंद्रनाथांनी आपल्या मंत्रसामर्थ्याने केला. रामप्रभूचे दर्शन प्रत्यक्ष घेऊन मच्छिंद्रनाथ समुद्रकिनाऱ्याने तीर्थाटन करीत करीत चंद्रगिरी नावाच्या गावी आले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

२. गोरखनाथ

चंद्रगिरी नावाच्या गावी मच्छिंद्रनाथ आले होते. 'अलख निरंजन !' असा आदेश देऊन ते भिक्षा मागू लागले. एका मोठ्या वाड्यापुढे आल्यावर तेथील सरस्वती नावाच्या बाईने त्यांना भिक्षा आणली. तिचा उदासवाणा, दुःखी चेहरा पाहून मच्छिंद्रनाथ म्हणाले, "बाई, वाड्यात अशी सामसूम का ?"

"काय करणार ! महाराज, आम्हाला मूलबाळ नाहीऽऽ!" त्या बाईने खुलासा केला; तेव्हा मच्छिंद्रनाथांनी तिला एक चिमूटभर भस्म दिले आणि ते म्हणाले, "माते हे भस्म पाण्यात टाकून रात्री झोपतांना ते पाणी पी म्हणजे तुला पुत्र होईल; आणि हो, बारा वर्षांनंतर मी पुन्हा येईन त्या वेळी तुझ्या त्या पुत्राला भेटून आशीर्वाद देईन !"

मच्छिंद्रनाथ तेथून गेले. बाईने ते भस्म पदरात बांधून ठेवले. दुपारी शेजारणीजवळ तिने पुत्रलाभ होण्याचा आनंद सांगितला तेव्हा शेजारीण नाक उडवून तिला म्हणाली, "अशी राख पिऊन कुठं मूल होत असतं का? अगं, हे फिरते जोगडे भारी वाईट असतात. तुला त्या बैराग्यानं ही मोहिनीच घातली आहे. धोका होईल गंऽबाईऽऽ तुला !"

मग सरस्वतीने ती भस्माची पुरचुंडी सोडली आणि ते भस्म उकिरड्यावर टाकले.

बारा वर्षे निघून गेली. मच्छिंद्रनाथांची स्वारी पुनः

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्या गावी आली. सरस्वतीच्या वाड्यापुढे येऊन त्यांनी अलख निरंजनचा आदेश दिला. सरस्वतीने भिक्षा आणली, पण मच्छिंद्रनाथ तिला म्हणाले, "माते, तुझा मुलगा आता बारा वर्षांचा झाला असेल! कुठे आहे तो ? मला भेटव त्याला !"

सरस्वतीने त्यांना ओळखले आणि आठवण होऊन ती एकदम भ्याली. ती म्हणाली, "महाराज, माफ करा ! तुम्ही दिलेले ते भस्म मी प्यायले नाही. ते भस्म मी तिकडे त्या उकिरड्यात टाकून दिले होते होऽऽ!" अरेरे ! माते तू हे ठीक केले नाहीस ! असो. दाखव मला ते ठिकाण !" मच्छिंद्रनाथ असे म्हणाले आणि बाईने दाखविलेल्या उकिरड्याजवळ गेले. मच्छिंद्रनाथांनी उकिरड्याजवळ जाऊन आदेश दिला, "हे सूर्यपुत्रा हरिनारायणा, बाहेर येऽ मी मच्छिंद्रनाथ, तुला बोलावतो आहेऽऽ, बाहेर ये ऽऽ!"

"गुरुजी ऽ हा माझ्या डोक्यावरील शेणाचा डोंगर काढा, मग मी बाहेर येतो ऽ" असा आवाज त्या उकिरड्यातून आला. तो ऐकून सरस्वतीला नवल वाटले. मग कुदळ-फावडे आणून तो उकिरडा उकरण्यात आला. तेव्हा त्यातून बारा वर्षे वयाचा एक सुंदर, तेजस्वी कुमार बाहेर आला. त्याने मच्छिंद्रांचे दर्शन घेतले. त्याला पाहून सरस्वतीला खूप पश्चात्ताप झाला.

मच्छिंद्रनाथ म्हणाले, "हरिनारायणा, तू गेली बारा वर्षे त्या गोबरात होतास म्हणून तुला मी गोरख हे नाव देतो. चल आता! माझ्याबरोबर चल. आपण तीर्थयात्रा करीत फिरू !" मग गोरखला घेऊन मच्छिंद्र

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निघून गेले. कनकगिरी नावाच्या गावात त्यांचा मुक्काम पडला. दुपारच्या वेळी गोरख गावात भिक्षेला गेला. एकाच्या घरी त्याला श्राद्धाचे भरपूर अन्न भरलेले ताट मिळाले. ते त्याने मच्छिंद्र गुरूला वाढले. मच्छिंद्रनाथ म्हणाले, "अहाहा ! गोरखबाळा, अरे या अन्नातले वडे मला खूपच आवडले रे ऽ आणखी थोडे असते तर..."

"आणखी थोडे वडे मी लगेच घेऊन येतो गुरुजीऽऽ" असे म्हणून गोरख पुनः त्या घरी गेला. त्याने मालकीण बाईला आणखी वडे मागितले. "माझ्या गुरूला ते फारच आवडले हो, म्हणून त्यांच्यासाठी थोडे आणखी वडे द्याच !" असे तो म्हणाला. त्यावर त्या बाई म्हणाल्या, " वारेवा ऽऽ! गुरूचं नाव सांगतोस काय ? एवढी जर तुला गुरूची भक्ती आहे ऽऽ तर तुझा डोळा काढून मला दे ऽ मी देते आणखी वडे !"

बाईचे ते शब्द ऐकताच गोरख शिष्याने लगेच आपले बोट डोळ्यात खुपसले आणि भस्सकन बुबुळ काढून ते त्या बाईच्या हातावर ठेवले. मग मात्र त्या बाई खूपच घाबरल्या. डोळ्यांतून भळाभळा वाहणारे रक्त गोरखने बोळ्याने दाबून धरले. आणि तो म्हणाला, " बाई ऽ द्या बरं आता आणखी वडे ऽऽ"

त्या बाईने मग घरातून आणखी वडे आणून गोरखला दिले, आणि ते त्याच्या डोळ्याचे बुबुळही त्याचे त्याला परत देऊन टाकले. ते वडे घेऊन गोरख शिष्य आपल्या गुरूजवळ आला. त्याने ते वडे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गुरूच्या ताटात वाढले. पण त्याने दाबून धरलेला तो डोळा पाहून मच्छिंद्रनाथ म्हणाले, "काय रे डोळा असा दाबून का धरला आहेस ?"

मग गोरख शिष्याने सर्व हकीगत सांगितली आणि हातातील ते बुबुळ गुरूला दाखविले. मच्छिंद्रनाथ म्हणाले, "शाबास बाळ! गुरूसाठी तू हे अगदी अचाट कार्य केले आहेस. थांब. सोड तो बोळा!" मच्छिंद-नाथांनी मग ते बुबुळ घेऊन गोरखाच्या डोळ्यात पुनः जसेच्या तसे बसवून दिले आणि आपल्या मंत्रसामर्थ्याने त्याला नवी दिव्य दृष्टी दिली. मच्छिंद्रांनी सर्व विद्या त्या गोरखाला दिली. अस्त्रविद्या, मंत्रविद्या शिकविली.

एके दिवशी संजीवनी मंत्र पाठ करता-करता गोरखाने मुलांच्या खेळातील चिखलाच्या गाडीवर बसविण्यासाठी एक मातीचा गाडीवान पुतळा तयार केला. तोच काय आश्चर्य ! त्या मातीच्या पुतळ्याला जीव आला, त्याचे एक लहान बाळ बनले आणि ते ट्याहाँ ट्याहाँ रडू लागले. मुले आणि गोरखही त्या जिवंत बाळाला पाहून भूत भूत म्हणून भिऊन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पळून गेले.

मच्छिंद्रनाथांनी ते बाळ पाहिले आणि ओळखले, की हा करभंजननाथ जन्माला आला आहे ! मग ते मूल त्यांनी त्या गावातील मधू ब्राह्मणाला दिले. त्याची बायको गंगाबाई ! मच्छिंद्रनाथ म्हणाले, "मूलबाळ नाही, आता हा तुमचा बाळ समजून याला वाढवा! बारा वर्षांनी माझा शिष्य गोरखनाथ येथे येईल आणि तो याला शिष्य बनवील. या बाळाचे नाव गहिनी असे ठेवा." मग त्या बाळाच्या कपाळी भस्म लावून मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथाला घेऊन बदरिकाश्रमात गेले. तेथे गोरखाला बारा वर्षे तपाचरणाला बसवून ते पुढे स्त्रीराज्यात गेले. तिकडेच ते रमले

***

३. जालिंदरनाथ आणि कानिफनाथ

हस्तिनापुरचा राजा ब्रह्मदेव याने सोमयाग ह्या नावाचा मोठा यज्ञ केला. अग्निदेवाने प्रसाद म्हणून राजाला एक नवजात सुंदर बालक दिले. राजाने ते बालक सुलोचना राणीला दिले तेव्हा राणी म्हणाली, "आपल्या मीनकेतूला हा एक पाठीराखा भाऊ मिळाला. याचे नाव जालिंदर असे ठेवू !"

राजाराणीने जालिंदराचे चांगले पालनपोषण केले. त्याची मौंज केली. त्याला खूप शिक्षण दिले. नंतर त्याचे लग्न करायचे ठरविले पण तो म्हणाला, "मी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लग्न करणार नाही." तरीही राजाराणीने त्याचे लग्न ठरविलेच.

मग एका रात्री जालिंदर राजवाड्यातून गुपचूप निघून गेला. तो दूर दूर जंगलात जाऊन गवतात झोपला. त्या वेळी जंगलात वणवा पेटला, पण अग्नीने जालिंदराला अगदी सुरक्षित ठेवले. शोध घेणाराला वाटले, की त्या वणव्यात जालिंदर जळून गेला असेल.

अग्निदेवाने मग जालिंदराला दत्तात्रेयाकडे नेले. दत्ताने जालिंदराला बारा वर्षे आपल्याजवळ ठेवून, त्याला सर्व प्रकारच्या विद्या शिकविल्या. दत्ताबरोबर जालिंदर कोल्हापूर, माहूर, पांचाळेश्वर वगैरे ठिकाणी खूप फिरला. त्याने तीर्थयात्राही केल्या.

नंतर बदरिकावनात जाऊन जालिंदराने बारा वर्षे कडक तपश्चर्या केली. सर्व विद्यांत तो तरबेज झाला. साऱ्या देवदेवता त्याने प्रसन्न करून घेतल्या. भगवान आदिनाथ शंकराने जालिंदराला नाथपंथाची दीक्षा दिली आणि लोककल्याणासाठी त्याला जगभर फिरण्याची आज्ञा केली. बदरिकाश्रमात एकदा ब्रह्मा-विष्णू-शंकरांबरोबर जालिंदरनाथ फिरत होते त्या वेळी एक विलक्षण प्रसंग घडला.

एक भला मोठा हत्ती हिमालयात एके ठिकाणी अगदी स्वस्थ उभा होता. गेली कित्येक वर्षे तो त्याच ठिकाणी ताटकळत उभा होता. ब्रह्मदेव म्हणाले, "जालिंदरा, या हत्तीच्या कानात प्रबुद्ध नारायणाने जन्म घेतलेला आहे. तू त्याला हाक मार म्हणजे तो बाहेर येईल आणि तुझा शिष्य बनेल."

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जालिंदरनाथाने मग मंतरलेली भस्मचिमूट त्या हत्तीवर टाकली आणि हाक मारून तो म्हणाला,

"अहो प्रबुद्ध नारायणा, आता बाहेर या. आम्ही तुम्हाला आता कानिफ हे नाव देऊ! या, बाहेर या!"

ती हाक ऐकताच काय नवल ! त्या हत्तीच्या कानातून सुमारे सोळा वर्षे वयाचा तेजस्वी कुमार बाहेर आला. त्याने जालिंदराला आणि त्या तिन्ही देवांना नमस्कार केला. जालिंदराने त्याला आपला शिष्य बनविला.

तीर्थयात्रा करीत करीत जालिंदरनाथ फिरत होते. रानातून गवताचा भारा डोक्यावर आणून ते मुक्कामाच्या गावी गाईगुरांना गवत घालीत असत. त्यांच्या डोक्यावर असलेला तो गवताचा भारा मात्र अधांतरीच! तो अजब चमत्कार पाहून लोक चकित होत असत.

गौडबंगाल देशात हेलापट्टण राजधानीत जालिंदरनाथांचा मुक्काम पडला. त्यांच्या डोक्यावरील तो अधांतरी चाललेला गवताचा भारा राजवाड्याच्या माडीतून राजमाता मैनावतीने पाहिला. ती म्हणाली, " हा कोणीतरी महान योगी पुरुष आहे. याला आपण गुरू केले पाहिजे !" मग रात्रीच्या वेळी ती माता मैनावती कांबळे पांघरून गुपचूप त्याच्या भेटीला गेली.

मैनावती जालिंदरनाथांना भेटली. ती म्हणाली,

"महाराज, माझे पती गेल्यापासून माझे जीवन उदास झाले आहे. माझा पुत्र गोपीचंद सध्या राजवैभव भोगीत आहे ! पण कधी ना कधी हे सारे वैभव सोडून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आम्हाला जावेच लागेल; तेव्हा मोक्षप्राप्तीसाठी तुम्ही आमचे गुरू व्हा आणि आमच्या जीवनाचे सार्थक करा!"

जालिंदरनाथांनी तिला खूप झिडकारले. पण छे! मैनावतीने त्यांचा पिच्छा सोडलाच नाही. ती दररोज रात्री गुपचूप येऊन जालिंदरनाथांची सेवा करीतच राहिली.

राजमातेचे ते वागणे राणी लुमावतीला मुळीच आवडले नाही. एकान्तात राजा गोपीचंदाला ती म्हणाली, "महाराज, तुमची आई त्या जोगड्याच्या नादी लागली आहे. रोज रात्री गुपचूप ती त्याच्याकडे जाते ! त्या वेडीला आम्ही काय सांगावे !"

राजा गोपीचंदाने मग गंभीरपणे विचार केला आणि दुसऱ्याच मध्यरात्री सेवकांकडून एक भलामोठा खड्डा केला. जालिंदरनाथाला उचलून त्या खड्ड्यात पुरून टाकले. दुसऱ्या दिवशी आवई उठली की, "तो वेडा जोगी जालिंदर राजधानी सोडून दूर कोठेतरी निघून गेला." ते ऐकून मैनावतीला खूप वाईट वाटले.

तिकडे बदरिकाश्रमात बारा वर्षे तपश्चर्या पूर्ण करून गोरखनाथ निघाले. ते गुरू मच्छिंद्रनाथांचा शोध घेत घेत हेलापट्टणला आले. तेथे त्यांना समजले की, कोणीतरी एक जालिंदरनाथ नावाचे जोगी येथे आले होते, पण ते थोड्याच दिवसांनी येथून बेपत्ता झाले.

मग गोरखनाथांनी कसून शोध घेतला. तेव्हा एका रात्री त्या खड्ड्यातून त्यांना आवाज ऐकू आला की,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
"हे जोगी, मी जालिंदरनाथ येथे खड्ड्यात अडकून पडलो आहे ! माझा शिष्य कानिफनाथ याला तू ही वार्ता सांग. तो येथे येईल आणि मग माझी येथून सुटका होईल ! जा, सांग त्याला हे !" मग गोरखनाथ तेथून निघाला. गुरू मच्छिंद्रनाथांबरोबरच कानिफनाथाचाही तो शोध घेऊ लागला.

तिकडे बदरिकाश्रमातील बारा वर्षे तपश्चर्या पूर्ण करून कानिफनाथ आपले गुरू जालिंदरनाथ यांचा शोध घेत घेत सातशे शिष्यांसह फिरत होता.

स्त्रीराज्याच्या हद्दीवर येताच कानिफनाथाची गाठ स्वतः मारुतीशी पडली. मारुती म्हणाला, "तू स्त्रीराज्यात जाऊ नकोस. तेथे मी मच्छिंद्रनाथांना संसारपाशात सध्या अडकविले आहे. तू त्यांना त्रास देशील. परत घेऊन जाशील."

कानिफनाथ म्हणाले, "मी तसे काही करणार नाही !" मग कानिफनाथाला शिष्यांसह स्त्रीराज्यात प्रवेश मिळाला. शृंगमरुडला राजधानीत मच्छिंद्रनाथाची भेट झाली तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाले, "तू कानिफनाथ आहेस ! मला वाटले की माझा शिष्य गोरखनाथच तुझ्या रूपाने येथे आला ! आता येथे महिनाभर आनंदाने राहा !"

महिनाभर तेथे राहून कानिफनाथ परतले. वाटेत गोरखनाथाची आणि त्यांची भेट झाली तेव्हा एका आंबराईत त्या दोघांचा शिष्यांसह तळ पडला. कानिफनाथाने शिष्याकरवी काही आंबे आणून गोरखला दिले. पण गोरखनाथाने मंत्र टाकून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

झाडावरील आंबे सहज कानिफनाथापुढे टाकले. खाऊन उरलेले आंबे पुनः मंत्राने त्याने झाडावर जसेच्या जसे लटकवून दिले.

ती गोरखनाथाची मंत्रशक्ती पाहून कानिफनाथ म्हणाला, "तू सामर्थ्यवान आहेस; पण तुझा गुरू मच्छिंद्रनाथ तिकडे स्त्रीराज्यात संसारपाशात अडकून पडला आहे ना. त्यामुळे त्या गुरूची नाथपंथी मंत्रशक्ती नाहीशी होईल पाहा !"

"माझ्या गुरूचा शोध तुझ्या या बोलण्याने मला लागला. आता तुझ्या गुरूचा पत्ता मी सांगतो. "तुझे गुरु जालिंदरनाथ हेलापट्टणात राजा गोपीचंदाने खड्ड्यात पुरून टाकले आहेत !"

बोलण्या-बोलण्यात त्या दोघांनाही आपापल्या गुरूंचे शोध लागले. मग ते दोघेही गुरूंना सोडविण्यासाठी निघून गेले.

***

४. शिष्यांनी गुरुजींना सोडविले !

शिष्यांच्या मोठ्या लवाजम्यासह कानिफनाथ हेलापट्टणाला आले. राजा गोपीचंदाने त्यांचे भव्य स्वागत केले. पण कानिफनाथ रागाने म्हणाले, "राजा स्वागताचे हे सोंग-ढोंग दाखवू नकोस. तू माझे गुरू जालिंदरनाथ यांना खड्ड्यात पुरून टाकलेस त्यांना सोडविण्यासाठी मी आलो आहे ! चल तो खड्डा मला दाखव !"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मग राजा गोपीचंद घाबरला. कानिफनाथाचे पाय धरून तो म्हणाला, "माझी चूक झाली, क्षमा करा. तुमचे गुरू ते ऽऽ"

ते जिवंत आहेत. तुझ्या मातेच्या गुरुभक्तीमुळे ते तेथे शांत समाधीत बसले आहेत. नाहीतर तुला त्याच वेळी त्यांनी जाळून भस्म केले असते ! आता मी सांगतो तसे कर म्हणजे गुरू जालिंदरनाथ त्या खड्ड्यातून बाहेत येतील. तुला आता ते क्षमा करतील !" एवढे बोलून कानिफनाथांनी राजाला ती युक्ती सांगितली आणि सर्व तयारी करून घेतली.

राजाने त्याच्या आकाराचा सोन्याचा पुतळा त्या लिदीच्या खड्ड्यावर ठेवला आणि कुदळ मारली, तोच खड्ड्यातून आवाज आला, "कोण आहे रे?" कानिफनाथ म्हणाले, "राजा गोपीचंद!" लगेच खड्ड्यातून मोठा जाळ आला आणि तो पुतळा जळून खाक झाला. मग दुसरा तसाच चांदीचा पुतळा ठेवला. तोही तसाच जळून गेला. अशा रीतीने धातूंचे पाच पुतळे भस्म झाले. जमलेल्या लोकांना खूपच नवल वाटले.

नंतर सहाव्या वेळी खड्ड्याची जमीन दुभंगली. आतून तेजःपुंज अशी जालिंदरनाथांची गुरुमूर्ती बाहेर आली. गुरूंनी कानिफशिष्याला प्रेमाने मिठी मारली. राजा गोपीचंद, राजमाता मैनावती, राणी लुमावती वगैरेंनी गुरू जालिंदरनाथांना वंदन केले.

नंतर थाटमाट करून गुरूपूजेचा कार्यक्रम झाला. राजा गोपीचंदाला नाथपंथाची दीक्षा देण्यात आली आणि मग ते सारे गुरुशिष्य लोककल्याणासाठी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तीर्थयात्रा करण्यास निघून गेले.

कलिंगा नावाच्या गाणारणीचा ताफा स्त्रीराज्यात चालला होता. वाटेत गोरखनाथ भेटले, ते म्हणाले, "मला घेऊन चला !" "अरे पण तू पुरुष आहेस. इकडे या स्त्रीराज्यात पुरुषांना बंदी आहे !" कलिंगा म्हणाली. त्यावर गोरखनाथ म्हणाले, "माझे गुरू मच्छिंद्रनाथ हे या स्त्रीराज्याच्या राणीजवळ आहेत. आम्ही नाथपंथी ! तरीपण गुरू संसारात रमले. त्यांना तेथून सोडविण्यासाठी मला तुमच्याबरोबर येऊ द्या !"

मग स्त्रीवेष धारण करून मृदंग वाजविणारी एक कलाकार म्हणून गोरखनाथ त्या ताफ्याबरोबर गेला. दरबार भरला. किलोत्तला राणीच्या शेजारी सिंहासनावर गुरू मच्छिंद्रनाथ बसले. राजकुमार मीननाथ वडिलांच्या मांडीवर बसला. नृत्य-गायनाचा कार्यक्रम सुरू झाला.

होता होता मृदंगातून सारखा आवाज येऊ लागला- "चलो ऽ मच्छिंदर ऽ गोरख आया ऽऽ गोरख ऽ आया ऽऽ !"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तो आवाज ऐकून मच्छिंदर गुरू कावरेबावरे झाले. सावरले. पुनःपुन्हा तोच आवाज- "चलोऽ मच्छिंदर ऽ गोरख आया ऽऽ !" मग मच्छिंद्रनाथ राणीच्या कानांशी लागले.

किलोत्तला राणीने मग त्या मृदंग वाजविणाऱ्या कलावंतिणीला बोलावून एकान्तात नेले, "तू कोण आहेस ते खरे सांग. तुला गुरूची शपथ आहे !" असे ती त्याला म्हणाली; मग गोरखनाथाने खरा प्रकार सांगितला तेव्हा ती किलोत्तला चकित झाली. मग गोरखनाथाला पुरुषवेष देऊन तिने त्याला मच्छिंद्रनाथापुढे आणले. ती म्हणाली, "माझा मीननाथ तसाच हा गोरखनाथ! या दोन्ही मुलांचा मी सांभाळ करीन !"

"पण माताजी, मी गुरूंना न्यायला आलो आहे. इथे राहायला आलो नाही. आम्हां नाथपंथी लोकांना संसारात गुरफटणे नाही !" गोरखनाथाने समजावले.

मच्छिंद्रनाथही म्हणाले, "मैनाकिनी, मला आता गेलेच पाहिले. मारुतीला दिलेलं वचन मी पूर्ण केलं आहे. तुझी इच्छा पूर्ण झाली आहे. आता मी आणि हा गोरखनाथ, मीननाथसुद्धा आमच्या नाथपंथीयांच्या अवतारकार्यासाठी जगभर प्रवास करू."

"जाणार तर जा, पण आणखी सहा महिने तरी इथे राहा. येत्या चैत्र शुद्ध प्रतिपदेला निघा. माझ्याही शापाची मुदत त्या वेळी संपणार आहे. मीही स्वर्गात जाणार !" मैनाकिनीने आग्रह केला; तसे ते सहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

महिने राहिले आणि नंतर चैत्र पाडव्याला ते तेथून तिघेही निघाले. निघताना किलोत्तला राणीने मच्छिंद्राच्या झोळीत एक सोन्याची मोठी वीट भेट म्हणून गुपचूप ठेवून दिली.

गोरखशिष्याने आपल्या गुरूला संसाराच्या मोहमायापाशातून सोडविले आणि तीर्थयात्रा करीत करीत ते तिघेजण वाल्मीकिपुरी (वांबोरी) जवळ आले. जवळच्या एका ओढ्यावर मच्छिंद्रनाथ स्नानासाठी गेले. तेव्हा त्या गोरख शिष्याने आपल्या गुरूच्या झोळीतून ती सोन्याची वीट काढली आणि दूर भिरकावून दिली.

मच्छिंद्रनाथ स्नानाहून आले. त्यांनी झोळी पाहिली आणि - "अरे, माझी सोन्याची वीट ? प्रेमाची भेट कोठे आहे ?" असे विचारले. गोरखनाथाने त्यांना समोरचा डोंगर दाखवला. पाहातात तर काय नवल ! तो गर्भागिरी संपूर्ण सोन्याचा झालेला !

मच्छिंद्रनाथांचा भ्रम दूर झाला. ते म्हणाले, "गोरखनाथ मला सोन्याच्या एका विटेचा मोह होता, पण तू तर माझ्यापुढे हा सोन्याचा डोंगरच उभा केला आहेस ! धन्य आहे ! शाबास ! आता याच डोंगरावर आपण सारे निवास करू ! येथे आदिनाथ शंकराची स्थापना करू. मोठे अन्नदान करू! जालिंदरनाथ, कानिफनाथ आणि तो तुझा गहिनीनाथ या सर्वांना येथे आण." मग गुरूंच्या आदेशाप्रमाणे गोरखनाथांनी तेथे सर्व व्यवस्था केली.

❋ ❋ ❋

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

५. भर्तरीनाथ

जयसिंग भाट आणि त्याची बायको रेणुका एकदा एका गवताळ रानात हिंडत होते. तेथे त्यांना अचानक एक बाळ दिसला. असेल तो सुमारे पाच वर्षे वयाचा! जयसिंगाने त्या बाळाजवळ जाऊन विचारले, "कोणाचा रे तू ? इथं असा एकटाच का ?"

त्या बाळाने टपोरे डोळे जयसिंगावर रोखले आणि टुणटुण उड्या मारीत तो पळून गेला. जयसिंगाने त्याचा पाठलाग करून त्याला पकडले. मग तो बाळ रडू लागला. रेणुका म्हणाली, "बाळा रडू नको. आमच्या घरी चल ! तू या रानात कसा ? तुझे आई-वडील ...."

पण त्या बाळाला काहीच बोलता येत नव्हते. तो कसातरी आवाज करून हातपाय झाडीत होता. मग जयसिंग भाटाने त्या बाळाला आपल्या घरी नेले. पाणी प्यायचे तर तो बाळ जनावरासारखा भांड्याला तोंड लावून पाणी प्यायचा. भाकरीऐवजी गवत खायचा.

रेणुकाने हळूहळू त्या बाळाला खाण्यापिण्याची आणि बोलण्याची सवय लावली. काही दिवसांनी जयसिंग भाट त्या मुलाला घेऊन काशीला गेला. विश्वेश्वराचे दर्शन घेत असताना पिंडीतून आवाज आला की "हा मुलगा म्हणजे द्रुमिल नारायणाचा अवतार आहे. याचा जन्म कौलिक ऋषींच्या भिक्षापात्रात म्हणजे भर्तरीत झाला. याला रानात एका

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हरिणीने वाढविले आहे. पुढे हा महान कीर्तिवंत होणार आहे !"

तो आवाज ऐकून जयसिंगाने त्या बाळाचे नाव 'भर्तरी' असेच ठेवले. भर्तरी सोळा वर्षे वयाचा झाला. एका व्यापाऱ्याच्या तांड्याबरोबर हिंडू लागला.

एके दिवशी रात्री कोल्हेकुई ऐकून भर्तरी म्हणाला, "सावध राहा, चोर येणार आहेत. कोल्ह्यांची भाषा मला कळते." आणि खरोखरच मध्यरात्री चोर आले. व्यापारी सावध होतेच. त्यांनी चोरांना पिटाळून लावले आणि भर्तरीचे आभार मानले.

नंतर अवंतीनगरीत कमल नावाच्या कुंभाराकडे हा भर्तरी राहू लागला. अवंतीचा राजा विक्रम याने या भर्तरीची हुशारी पाहून त्याला आपला युवराज केले. युवराज भर्तरीचे लग्न सुमंत प्रधानाची मुलगी पिंगला हिच्याशी झाले. पिंगला आणि भर्तरी यांचे एकमेकांवर प्रेम जडले. जणू काय ते एक दुसऱ्यासाठीच जगत होते. एके दिवशी भर्तरी जंगलात शिकारीला गेला. तिकडेच त्याचा मुक्काम पडला. 'भर्तरीला वाघाने ठार मारले.' अशी वार्ता पिंगलेला कळाली तेव्हा ती लगेच मरण पावली.

नंतर भर्तरी शिकारीहून परत आला. त्याला कळाले की, आपण मेल्याची खोटी वार्ता ऐकून पिंगला खरेच मेली ! तो तिच्या चितेजवळ जाऊन शोक करीत बसला. भर्तरीची ती अवस्था पाहून दत्तात्रेयांनी त्याच्याकडे गोरखनाथाला पाठविले. गोरखनाथांनी मग एक नाटक केले. एक रंगीबेरंगी मडके घेऊन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गोरखनाथ भर्तरीपुढे गेले आणि ठेच लागल्याचा बहाणा करून त्यांनी ते मडके फोडून टाकले. "अरेरे माझे मडके गेले रे गेले ऽऽ" असे म्हणून ते रडू लागले.

तो देखावा पाहून भर्तरीला हसू आले. तो म्हणाला, "अरे एवढेसे मडके गेले तर त्याचा तू हा असा शोक करतोस?" त्यावर गोरखनाथ म्हणाले, "आणि तू तरी इथे का बरे असा शोक करीत बसला आहेत ?"

भर्तरी म्हणाला, "अरे माझी प्रिय पत्नी पिंगला गेली आहे रे ऽऽ !" गोरखनाथ मग त्याला समजावीत म्हणाले, "अरे त्या पिंगलेसाठी एवढा धोशा ! एक पिंगला गेली तर तशा हजार पिंगला तुला मी देईन; पण माझ्या या रंगीबेरंगी मडक्यासारखे तू एक तरी दुसरे मडके देशील का ?"

"काय म्हणतोस? हजार पिंगला तू मला देशील?" भर्तरीने ताडकन विचारले. त्यावर गोरखनाथ शांत-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पणाने म्हणाले, "होय बाबा, होय!" असे म्हणून गोरखनाथांनी चिमुटीत भस्म घेतले आणि मंत्र टाकून ते फेकले. त्याबरोबर कायं आश्चर्य ! अंतराळातून हजारो पिंगला आलेल्या भर्तरीला दिसू लागल्या. बरोबर हुबेहूब पिंगलाच त्या ! खात्रीनेच त्या पिंगला होत्या. तोंडाने त्या भर्तरीला म्हणत होत्या, "अहो नाथ ऽऽ मी ऽ मीऽ पिंगला ऽ तुमची पिंगलाऽऽ"

भर्तरी एकदम चकित झाला. "खरेच की पिंगला! हजार पिंगला ! वाहवा रे किमया ! एक पिंगला गेली तर ..." असे पुटपुटत भर्तरीने गोरखनाथाचे पाय धरले आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहू लागला.

मग गोरखनाथाने त्याला शांत करून सहजच उपदेश केला की, "या जगातील प्रत्येक वस्तू नष्ट होणारी आहे. पिंगला गेली तसा तूही जाणारच आहेस; परंतु वेड्या या देहात जोपर्यंत आपण काहीतरी लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे ! आम्ही नाथपंथी हेच कार्य करण्यासाठी जगत आहे!"

"मला तुमच्या नाथपंथाची दीक्षा द्या. महाराज, आता माझे डोळे उघडले. नवी दृष्टी आली. मला घेऊन चला !" गोरखनाथांनी भर्तरीनाथाला गिरनार पर्वतावर नेले. दत्तात्रेयांनी भर्तरीला नीतिशास्त्र शिकविले आणि नंतर बारा वर्षे तपश्चर्या करण्यास त्याला बदरिकाश्रमात पाठविले.

❋❋❋

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

६. रेवणनाथ

नर्मदा नदीकाठी सहनसारूक नावाच्या शेतकऱ्याची वस्ती होती. एके दिवशी सहनसारूक नित्याप्रमाणे पहाटेच उठला. नदीवर अंघोळीला गेला. पाहतो तर वाळूत एक तान्हे मूल रडत आहे. मग त्याने ते मूल उचलून घरी आणले.

त्याची बायको म्हणाली, "हे मूल रेवा नदीच्या वाळूत सापडले, म्हणून याला आपण रेवण हे नाव देऊ!" रेवण हळूहळू मोठा झाला.

एके दिवशी पहाटेच उठून रेवण शेताकडे चालला होता. वाटेत त्याला दत्तात्रेय भेटले. त्यांनी रेवणला सिद्धिप्राप्तीचा मंत्र दिला. तो मंत्र पाठ करीत रेवण शेत नांगरीत होता. ऐन दुपारी महिमासिद्धी रेवणपुढे आली. ती म्हणाली, "बाळा, तुला काय पाहिजे ? रेवण म्हणाला,. "आम्हां शेतकऱ्यांना दुसरं काय पाहिजे? आमचं घर धन-धान्यानं सतत भरलेलं असावं आणि माझ्या हातून भरपूर अन्नदान व्हावं !"

सिद्धी म्हणाला, "तथास्तु !"

दुसऱ्या दिवशी रेवण पहाटे उठलाच नाही. त्याला उठवीत सहनसारूक म्हणाला, "अरे, शेतीकामासाठी शेतावर लौकर गेले पाहिजे !" रेवण म्हणाला, "बाबा, आता शेतावर जाण्याची जरुरी नाही. जरा घरात बघा, आपलं घर धान्यानं गच्च भरलेलं आहे!"

सहनसारूक घरात जाऊन पाहातो तर काय नवल!

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घरात धान्याची भली मोठी रास ! कोठ्यात धान्य ! गोठ्यातही धन ! ही काय किमया ? हा कोणीतरी अवतारी पुरुष आहे !" मग तो चमत्कार सहनसारूकाने जवळच्या बुंदल गावात सांगितला. लोकांच्या झुंडीवर झुंडी वस्तीवर लोटल्या. रेवणबाळाने त्या सर्व लोकांना टोपल्या भरभरून धान्य वाटले. कितीही धान्य वाटले तरी पुन्हा रेवणचे घर जसेच्या तसेच गच्च भरलेले असायचे.

एकदा त्या बुंदल गावी मच्छिंद्रनाथांचा मुक्काम पडला. रेवणच्या त्या धान्य किमयेची वार्ता त्यांना कळाली. मग अंतर्ज्ञानाने त्यांनी ओळखले की, "हा रेवण म्हणजे प्रत्यक्ष चमस नारायणाचाच अवतार आहे." मग मच्छिंद्रनाथांनी मोठी मौजच केली. मच्छिंद्रनाथ मैदानात बसले. "या चिमण्यांनो, या." असे म्हणताच शेकडो चिमण्या आल्या. मच्छिंद्राच्या अंगावर सारा चिवचिवाट झाला. मग काव काव ऽ आव आव ऽ म्हणताच कावळे आले, घारी आल्या, कोंबडे, बदके, मोर खूप पक्षी आले. मच्छिंद्रांनी त्या साऱ्यांना धान्य घातले. दाणे टिपून ते उडून गेले !

दुसऱ्या दिवशी गाईगुरांना चारा, कुत्र्या-डुकरांना अन्न! मग कोल्हे-लांडगे-वाघ आले. अबबब ऽ हिंस्र पशूही आले. मच्छिंद्रनाथाभोवतीचा तो मेळावा पाहून लोक भ्याले. चकित झाले !

ती वार्ता रेवणला कळाली. त्याने सिद्धीची प्रार्थना केली. तेव्हा सिद्धी त्याला म्हणाली, "बाबा रे, ही पक्षिकुळे आणि हिंस्र श्वापदे जमविण्यासाठी मोठी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तपसाधना करावी लागले. तू मच्छिंद्रनाथांना शरण जा म्हणजे तुझे कल्याण होईल !"

मग रेवण मच्छिंद्रनाथांना शरण गेला. त्यांनी रेवणाला ब्रह्मज्ञान दिले. गिरनार पर्वतावर नेऊन त्याला दत्तात्रेयाची भेट घडविली. दत्तांनी रेवणला नाथपंथाची दीक्षा दिली. सर्व विद्या शिकविल्या आणि बदरिकाश्रमात जाऊन बारा वर्षे तपश्चर्या करण्यास सांगितले. नंतर त्या रेवणनाथांनी देशभर हिंडून तीर्थयात्रेत लोककल्याण करावे, असा असा आदेश दिला.

रेवणनाथांची तपश्चर्या पूर्ण झाली. सर्व देवदेवता त्यांनी प्रसन्न करून घेतल्या. सर्व विद्या त्यांना अवगत झाल्या. मग लोककल्याणासाठी ते देशभर हिंडू लागले. होता होता माण देशातील विटेगावी एका ब्राह्मणाच्या घरी त्यांचा मुक्काम पडला. त्या रात्रीची गोष्ट -

मध्यरात्र झाली. घरातून रडण्याचे आवाज आले. रेवणनाथांनी चौकशी केली तेव्हा त्यांना कळाले की, "घरातील बारा दिवसांचा तान्हा बाळ मरण पावला आहे. माता शोक करीत आहे. रेवणनाथांना सटवीचा (सटीचा) राग आला. ते म्हणाले," मी येथे प्रत्यक्ष असताना सटीने हा अपशकुन करावा ना ! मी माझे सारे तपोबळ पणाला लावून त्या बाळाला पुनः जिवंत करीन !"

रेवणनाथ उठले, घरात जाऊन म्हणाले, "थांबा, रडू नका."

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



रेवणनाथ खूपच कळवळले. त्यांनी त्या बाळाच्या प्रेतावर मंतरलेली विभूती टाकली. मग योग समाधी लावून रेवणनाथ थेट यमलोकात गेले. यम म्हणाला, "माझं कामं मी केलं !" त्या ब्राह्मणाचा बाळ जिवंत झाला. तो चमत्कार पाहून साऱ्यांना नवल वाटले. सगळीकडे आनंदी आनंद झाला. बाळाच्या आईने रेवणानाथांचे पाय धरले. ❋❋❋

७. वटसिद्ध नागनाथ

कोशधर्मा नावाचा एक ब्राह्मण पत्रावळीसाठी पाने काढण्यास वडाच्या झाडावर चढला. तेवढ्यात ढोलीतून एका तान्ह्या मुलाच्या रडण्याचा आवाज त्याला ऐकू आला. एक नवजात बालक तेथे पालापाचोळ्यात हातपाय हलवीत पडलेले आहे. कोशधर्माने ते बालक अलगद उचलले; तोच काय नवल ! एक भलीमोठी नागीण सळसळत तेथून दूर पळाली. कोशधर्माला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भीती वाटली. त्याला वाटले की, या नागिणीने तर या बालकाला जन्म दिला नसेल ना?

कोशधर्माने पंचात गुंडाळून ते बालक घरी नेले. बायको म्हणाली, "आज हे काय विपरीत घडलंय ! वडाच्या झाडात नागिणीचं मूल ! आपण याला वटसिद्धनागनाथ हेच नाव ठेवू !"

नागनाथ मोठा झाला. सोबत्यांबरोबर खेळू लागला. जेवणासाठी मुलांची पंगत बसली. प्रत्येकापुढे वडाचे एकेक पान मांडलेले. त्या पानावर खोटे खोटे पदार्थ नागनाथ वाढू लागला. "हे मीठ ! हा भात, ही भाजी जरा तिखट झालीय ! जपून खा बरं का! हं चला, करा सुरू ! बोला ऽ हर हर महादेऽ व !"

असा पंगतीचा खेळ रोज चालायचा. कधी शिरापुरी तर कधी लाडू ! खोटं खोटं जेवण पोटभर करून मुलं ढेकर द्यायची ! गुरुवारी त्या खोट्या पदार्थांचा दत्तात्रेयाला नैवेद्यही व्हायचा ! नागनाथाचा तो भोजन-पंगतीचा खेळ मोठा मौजेचा होता.

मग एका गुरुवारी स्वतः दत्तात्रेय प्रभू मुलाचे रूप घेऊन त्या पंगतीत बसले. खोटं खोटं जेवून संतुष्ट झाले. जेवणानंतर दत्तांनी नागनाथाला बाजूला नेले आणि खरेखुरे अन्नपदार्थ सहज मिळविण्यासाठी त्याला सिद्धीचा मंत्र सांगितला. नागनाथ मंत्र म्हणायचा आणि पाहिजे ते अन्नपदार्थ त्या सिद्धीला मागायचे. मग त्या पदार्थांची ताटेच्या ताटे भरून पुढे येतील. "असे दत्तात्रेयांनी नागनाथाला सांगितले. दुसऱ्या दिवसापासून तो लुटुपुटीच्या जेवणाचा खेळ बंद होऊन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

खऱ्याखुऱ्या जेवणाच्या पंगती सुरू झाल्या. नागनाथाने तो सिद्धिमंत्र म्हणायचा आणि पाहिजे त्या त्या अन्न-पदार्थांची ताटेच्या ताटे भरून त्याच्यापुढे यायची. पंगत सुरू करा. म्हणा, "गुरु देऽ व दत्त ! लाडू घ्या ! आता ही जिलेबी, पोटभर होऊ द्या !" असे म्हणून नागनाथाने भरपूर वाढावे. मुले खरोखरीचे जेवण करून तृप्त व्हावीत आणि मग त्यांनी घरी जाऊन त्या जेवणाचा चमत्कार सांगावा.

होता होता मुलांबरोबर मोठी माणसेही पंगतीला येऊ लागली. सारा गाव जेवून जायचा, पण नागनाथाला काहीही कमी पडत नव्हते. नागनाथाच्या त्या अन्नदानाचे सारे नवलच झाले !

एके दिवशी नागनाथाच्या मनात आले की, ज्या गुरुदत्तात्रेयाने आपणाला हा अन्नदानाचा सिद्धिमंत्र दिला, त्या दत्ताची पुनः प्रत्यक्षच भेट घ्यावी. दत्तात्रेयाची स्वारी दररोज भिक्षेसाठी कोल्हापूरला येत असते.

मग नागनाथ आपल्या गावाहून गुपचूप निघून थेट कोल्हापुरला गेला. महालक्ष्मी मंदिरापुढे त्याने सिद्धिमंत्राच्या प्रयोगाने पंगतीचा थाट सुरू केला.

लौकरच कोल्हापुरातल्या चुली बंद पडल्या आणि दत्तात्रेयांना भिक्षान्न मिळेनासे झाले. मग त्यांनी कोरडा शिधा मागायला सुरुवात केली. सिद्धीचे अन्न घेणाऱ्या त्या साधू दत्तात्रेयाला नागनाथाने ओळखले आणि त्याला एकान्तात गाठून त्याचे पाय धरले. दत्तात्रेय म्हणाले, "वटसिद्धनागनाथा, तू प्रत्यक्ष अविर्होत्र नारायणाचा अवतार आहेस ! तुला मी आता

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नाथपंथाची दीक्षा देणार आहे ! चल बदरिकाश्रमात बारा वर्षे तप कर आणि सर्व विद्या शिकून लोककल्याणाचे कार्य कर."

दत्तात्रेयाबरोबर तो नागनाथ काशीला गेला. तेथे विश्वनाथाचे दर्शन घेऊन बदरिकाश्रमात गेला. बारा वर्षे तेथे त्याने कडक तपश्चर्या केली. भगवान शंकर आदिनाथांनी आणि दत्तात्रेयांनी त्याला सर्व प्रकारच्या अस्त्रविद्या-मंत्रविद्या शिकविल्या. वटसिद्धनागनाथ देशोदेशी हिंडू लागले. वडवाळ नावाच्या गावी नागनाथांनी मठ स्थापन केला. तेथे मच्छिंद्रनाथांची स्वारी फिरत फिरत आली. त्यांनी नागनाथांना ब्रह्मज्ञानाचा बहुमोल उपदेश केला.

***

८. चर्पटनाथ

सत्यश्रवा नावाचा एक ब्राह्मण भागीरथी नदीवर स्नानासाठी गेला. तेथे दर्भाच्या बेटात त्याला एक तान्हे बाळ दिसले. वाटेत त्याला नारदमुनी भेटले. ते म्हणाले, "ते बाळ म्हणजे प्रत्यक्ष पिप्पलायन नारायणाचा अवतार आहे ! दर्भाच्या बेटात ब्रह्मदेवाच्या तेजाचा तो गर्भ वाढला आहे ! तुम्ही त्या चर्पटबाळाला घरी न्या. त्याचे पालनपोषण करा, म्हणजे तुमचे कल्याण होईल !"

सत्यश्रव्याने चर्पटाला घरी नेले. चांगले वाढविले त्याची मौंज केली. त्याला पूजा, पोथी शिकविली.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वेदविद्या दिली. मग नारदाने बटूचे रूप घेऊन सत्यश्रवाचे घर गाठले. माझं नाव कलंब. मी गरीब ब्राह्मणाचा मुलगा आहे. तुमच्याकडे मी ब्रह्मविद्या शिकायला आलो आहे." असे त्या बटूने सत्यश्रवाला सांगितले. मग सत्यश्रवाने चर्पटाबरोबरच कलंबालाही ब्रह्मकर्म शिकविले.

एके दिवशी चर्पट आणि कलंब एका यजमानाच्या घरी पूजेला गेले. तेथे दक्षिणेवरून यजमानाशी चर्पटाचे भांडण झाले. कलंबाने सत्यश्रवाला ते सांगितले. सत्यश्रवाला राग आला. त्याने चर्पटाला चोपून काढले.

चर्पट रुसला आणि रात्री गुपचूप निघून गेला. त्याला शोधायला कलंब गेला तर तोही तिकडेच बेपत्ता झाला.

तिकडे चर्पटाला शोधून कलंबाने म्हणजे नारदाने थेट ब्रह्मदेवाकडे नेले. मग चर्पटाने बद्रिकाश्रमात बारा वर्षे तपश्चर्या केली. भगवान आदिनाथ शंकर, गुरू दत्तात्रेय आणि मच्छिंद्रनाथ यांनी चर्पटाला सर्व विद्या शिकविल्या. मंत्रबोध केले. मग चर्पटाने सर्व देव-देवतांना प्रसन्न करून घेतले. नाथपंथाची दीक्षा घेऊन तीर्थयात्रा केल्या. चर्पटनाथ आता खूपच सामर्थ्यवान झाले होते. नारदाला त्यामुळे आनंद झाला.

इंद्राने एकदा भरदरबारात नारदाचा मानभंग केला होता. त्याचा बदला आता चर्पटाच्या हातून घ्यावा, असे नारदाने ठरविले. मग तो चर्पटाला म्हणाला, "आपण इंद्राच्या अमरावतीला जाऊ आणि स्वर्गयात्रा करू ! त्यामुळे तुम्हाला आणखी सामर्थ्य प्राप्त होईल!"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मग नारदाबरोबर चर्पटनाथ अमरावतीला गेले. तेथे नंदनवनात फिरले. त्यांनी अमृतफळे खाल्ली. नंतर बागेतील सुवर्णपुष्पे तोडीत असता रक्षकाने चर्पटनाथाला पकडले. नारद निसटून गेले. न विचारता फुले तोडली म्हणून रक्षकाने चर्पटनाथांना चपराक ठेवून दिली.

चर्पटनाथ रागावले. त्यांनी बागेतील साऱ्या रक्षकसेवकांना वातास्त्र मंत्राने जमीनदोस्त केले. मग इंद्र आला; त्याचीही तीच स्थिती केली. स्वर्गातील सारे देव आले. त्यांनाही चर्पटनाथांनी आपल्या सामर्थ्याचा प्रताप दाखविला. स्वर्गलोकात सारा हलकल्लोळ उडाला.

नंतर ब्रह्मदेवांनी स्वतः येऊन चर्पटनाथांची समजूत घातली. आणि सर्व देवांची सुटका केली. कळीच्या नारदाने इंद्राचा बदला घेण्यासाठी ते कारस्थान केले होते.

अशा प्रकारे नवनारायणांनी नवनाथ अवतार घेऊन द्वारकाधीश श्रीकृष्णाचे दुष्टांचा नाश, सज्जनांचे संरक्षण आणि जगाच्या कल्याणाचे महान कार्य केले. ते नवनाथ अजूनही गुप्तपणाने या पृथ्वीवर वावरत आहेत!

प्रकाशक : प्रकाश य. कुंदूर
मे. शारदा साहित्य,
६८१ ब, विनयाक टॉवर,
अप्पा बळवंत चौक, पुणे २.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक : आनंद अं. कुंदूर
मे. श्रीराम ऑफसेट
१४/२३ गायत्री, धायरी, पुणे ४१.
☎ ४३९२००९

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शिवोपासना करणाऱ्या शिवभक्तांकरिताच नव्हे.
तर प्रत्येक भाविकाच्या संग्रही असावे असे

सुबोध व सचित्र श्री शिवपुराण

भविष्याच्या विचारात पडणाऱ्या जनसामान्यांना तसेच
हस्तरेषाशास्त्र व जन्मकुंडलीच्या अभ्यासकांना मार्गदर्शक

तुमचे भविष्य तुम्हीच पहा

कुंडली तंत्र व हस्तरेषा शास्त्र

म. श्री. पर्वतीकर — किंमत २० रुपये

रत्नांची पारख असावी तरच ते लाभते. तेव्हा रत्नांचे रहस्य जाणा !

रत्न धारण करा व भाग्य बदला

रत्नरहस्य

पं. किसनलाल शर्मा — किंमत ५० रुपये

ग्रहांची शांती म्हणजे संकटातून मुक्ती ! त्यासाठी हवा योग्य उपाय !
ग्रहपीडितांना उत्तम दिलासा

नवग्रह उपासना आणि
ग्रहदोष निवारणाचे उपाय

पं. किसनलाल शर्मा — किंमत ६५ रुपये

आपल्या आर्थिक विवंचनेतून बाहेर पडा ! सर्वांत सोपा उपाय

धनप्रदायक

श्री कार्तिक स्वामी दर्शन

(इतर धनप्रदायक उपायांसह)

पं. किसनलाल शर्मा — किंमत २५ रुपये

सर्व बुकसेलर्सकडे उपलब्ध अथवा संपर्क साधा.

सरस्वती पब्लिकेशन्स् २८/अ, अंबर चेंबर्स, बुधवार पेठ, पुणे २.
☎ ४४५१२१९/४४६७७९८ फॅक्स : (०२०) ४४५४०८६